# सज्जाद हुसेन - भाग २



त्यानंतर १९५२ मध्ये त्यांचा 'संगदिल' प्रदर्शित झाला, ज्यात त्यांनी मेलडीचा जणू इतिहासच रचला. ह्या सिनेमातील पुढील सुरेख गाणी तुमच्या आठवणीत नक्कीच असतील -

| | |
|---|---|
| १. धरतीसे दूर गोरे बादलोंके पार आ जा | आशा आणि गीता दत्त |
| २. दर्शन प्यासी आयी दासी | गीता दत्त |
| ३. ये हवा ये रात ये चांदनी | तलत मेहमूद |
| ४. वो तो चले गये ऐ दिल | लता |
| ५. दिल मे समा गये साजन | लता आणि तलत |
| ६. कहाँ हो कहाँ मेरे जीवन सहारे | तलत |

वरील 'कहाँ हो कहाँ' ह्या गाण्यातील, विशेषत: हे गाणे वरच्या सुरांत संपते तेव्हां सज्जाद ह्यांनी बांधलेली चाल आणि वाद्यमेळाची रचना पाहून अचंबा तर वाटतोच पण त्याच वेळी इतर संगीतकार व सज्जाद ह्यांच्या शैलीतील फरक जाणवतो. मनाला भावणारा व आकर्षक असा फरक. वेस्टर्न मेलडीमध्ये नित्य वापरल्या जाणाऱ्या काऊंटर मेलडीचा ते सहज वापर करतात. गाण्याच्या नेहमीच्या चालीच्या पार्श्वभूमीवर एक किंवा दोन वाद्ये वेगळ्याच सुरात वाजवली जातात आणि तेही आकर्षक वाटते. 'दिल मे समा गये साजन तू' ह्या गाण्यात त्याचा किती सुंदर उपयोग त्यांनी करून घेतला आहे. पुढील शब्दरचनेशी सुसंगत असा सितार आणि सारंगी यांचा सुरेख उपयोग करून त्यांनी 'ये हवा ये रात' या गाण्याची सुरुवात अतिशय सुंदर केली आहे.

परंतु तरीही १९५२ च्या 'संगदिल' नंतर सज्जाद यांनी खास संस्मरणीय अशी गाणी मात्र दिलीच नाहीत. त्यानंतर १९६३ मध्ये 'रुस्तुम सोहराब' या चित्रपटाद्वारे त्यांनी आपल्या कारकीर्दीतील अखेरची गाणी सादर केली. या चित्रपटात त्यांनी इराणी वाद्यांचा छान उपयोग करून घेतला होता.

’ऐ दिलरुबा, नझरे मिला’ हे लताचे गाणे - यात सज्जाद हुसेन यांनी पर्शियन भावभावनांचा सुंदर आविष्कार सादर केलाय तर ’माझंदरा माझंदरा’ हे तलतचे तर ’ये कैसी अजब दास्तां हो गयी’ हे सुरैय्याने म्हटलेले गाणे आणि ’फिर तुम्हारी याद आयी ए सनम’ हे रफी, मन्ना डे, सादत आणि कोरस यांनी गायलेले गाणे अशी कितीतरी संस्मरणीय, कानामनाला भावलेली गाणी सज्जाद यांनी आपल्याला दिली आहेत.

सज्जाद यांच्या १४ चित्रपटांची नामावळी पुढीलप्रमाणे आहे -
१९४४ : ’गाली’ (हनुमान प्रसाद यांच्याबरोबर)
१९४५ : ’दोस्त’, आणि ’धरम’
१९४६ : ’१८५७’, आणि ’तिलिस्मी दुनिया’
१९४७ : ’कसम’, आणि ’मेरे भगवान’
१९५० : ’खेल’, आणि ’मघ्रूर’ (बुलो सी. रानी व राम पंजवानी बरोबर)
१९५१ : ’हलचल’ (मोहम्मद शफी बरोबर) आणि ’सैय्या’
१९५२ : ’संगदिल’
१९५५ : ’रुख्साना’
१९६३ ’ रुस्तम सोहराब’

(क्रमश:)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून.)

**NOTE:** Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories” is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”, which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician's role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book "Talat Mahmood, The Velvet Voice" was released in May 2015. To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com